आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# २६९५ जणांची आरोग्य तपासणी

## बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजन



**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, के. के. वाघ फाऊंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाऊंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांचे संयुक्त विद्यमाने बाळासाहेब देवराम वाघ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ रविवारी (दि.८ ) सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेदरम्यान के. के. वाघ शैक्षणिक संकुल भाऊसाहेबनगर, ता.निफाड येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न झाले. यावेळी २ हजार ६९५ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यामध्ये नेत्र तपासणी- ८०७, हृदय तपासणी- ४७६, महिला कॅन्सर तपासणी-२२८, अस्थिविकार तपासणी- ३५८, फुफ्पुस व छाती तपासणी- २४१ कान-नाक- घसा तपासणी- २०९, दंत तपासणी- १०९, पोटविकार तपासणी- १०१, मेंदू विकार तपासणी- ८१, जनरल फिजिशीअन - ४३, किडनी विकार तपासणी-३४ अशा एकूण नागरिकांनी विविध तपासण्या केल्या. तसेच ८०७ नेत्र तपासणी रुग्नांपैकी २४१ रुग्नांना मोतीबिंदू निष्पन्न झाला. यावेळी

डॉ. प्राची पवार, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त शकुंतला वाघ, अजिंक्य बाळासाहेब वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ.नांदुरकर, प्राचार्यकडवे, डॉ. कर्डिले उपस्थित होते.

Nashik Edition
Feb 10, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com